**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ, जिंतूर, सेलू, गंगाखेड, पालम व पुर्णा तालुक्यातील ७८ प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक १९/०१/२०२२ रोजी सकाळी ११:३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

.......................................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या परभणी जिल्हयातील परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ, जिंतूर, सेलू, गंगाखेड, पालम व पूर्णा तालुक्यातील ७८ प्रस्तावित असलेल्या वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक १९/०१/२०२२ रोजी सकाळी ११:३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोकसुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. **श्री. महेश वडदकर,** : अध्यक्ष
अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, परभणी.

२. **डॉ. प्रविण जोशी,** : सदस्य
प्रादेशिक आधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद.

२. **श्री. सो. म. कुरमूडे** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, परभणी

परभणी जिल्हयातील परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ, जिंतूर, सेलू, गंगाखेड, पालम व पूर्णा तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळुघाटाच्या पर्यावरण विषयक मंजूरीसाठी जाहीर लोक सुनावणीसाठी मा. अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली दि. १९ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे आयोजित करण्यात आली होती. सदरील पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी कोविड-१९ नियमावलीचे पालन करुन घेण्यात आल्याने तालुकानिहायघेण्यात आली होती.

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले असल्याचे नमूद केले. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी यांचा, परभणी जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. १५/१२/२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी घेण्यात येत आहे असे नमूद केले. सदर बाबतची जाहीर सुचना दि. १७/१२/२०२१ रोजीच्यो दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर वाळूघाटांच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी येथे लिखीत स्वरूपात पाठविण्याचे वा इमेलद्वारे पाठविण्याचे नमुद करण्यात आले होते.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
- जिल्हा उदयोग केंद्र, परभणी.
- जिल्हा परिषद, परभणी.
- तहसिलदार, तहसिल कार्यालय परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ, जिंतूर, सेलू, गंगाखेड, पालम व पूर्णा.
- ग्रामपंचायत कार्यालय - परभणी तालूका- पिंपरी देशमूख, काष्टगाव,. नांदगाव खुर्द., उखळद, पिंपळगाव टोंग, सावंगी खू., वडगाव तर्फे टाकळी, झरी, मांगणगाव, धार, राहटी, टाकळी बोबडे, मूरुंबा, मूरुंबा (दूरडी), सनपूरी/सूलतानपूर, मांडवा. पाथरी तालूका- गोपेगांव, मंजरथ, पाटोदा ग.की., मूदगल. मानवत तालूका- थार, वांगी,

कोथाळा, राजूरा, गोगलगाव, सावंगी मगर, पारडी, शेवडी जहांगीर सोनपेठ तालूका- वाघलगाव, मोहळा, खडका. जिंतूर तालूका- वझर, गणेशनगर, सावळी बू., पिंपळगाव गायके, निलज. सेलू तालूका- काजळीरोहीना, डिग्रस खू., वलंगवाडी, आबेगाव दिगर, पिंपरी खू. गंगाखेड तालूका- पिंपरी, मसला, महातपूरी, आनंदवाडी (महातपूरी अंट), चिंचटाकळी व गौंडगाव (सयुंक्त), नागठाणा, धारासूर परिसर. पालम तालूका- फरकंडा, बरबडी, राहाटी, गूंज, धनेवाडी, फळा, दुटका. पूर्णा तालूका- देवठाणा, देवूळगाव दूधाटे, मूंबर, धानोरा काळे, वझूर, खरबडा, सातेगाव, मिठापुर, कौडगांव, धानोरा मोत्या, पेनूर, निळा, सातेफळ, कळगाव, महागाव, कान्हेगाव, माटेगाव, धनगर टाकळी, कंठेश्वर, पिंपळगाव लिखा, पिंपळगाव सरंगी, बानेगाव, फूकटगाव.

- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, परभणी.
- प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद.
- (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई.
- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
- प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

श्री. सो.म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ परभणी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सांगितले की, सदर जाहीर सुचनेस अनुसरुन उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ परभणी यांचेकडे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, परभणी यांच्याकडुन निवेदन प्राप्त झाले आहे निवेदनात असे नमुद आहे कि, प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत ग्रामीण भागातील रस्ते ठराविक वजन वाहतूक क्षमतेसाठी बनविण्यात आले आहेत त्यामुळे या रस्त्यावर मर्यादेपेक्षा जास्त क्षमतेच्या वजनाच्या वाहनांनी वाहतुक करणारी वाहणे कोणत्याही कारणासाठी रस्ता वापरत असतील तर त्या रस्त्याच्या झालेल्या नुकसानीसाठी संबंधीत वाळुघाट लिलावधारक जबाबदार असेल याबाबतचे प्रोव्हिजन करण्याबाबत नोंद घेण्यात यावी असे सुचविले आहे तरी या निवेदनाबाबत सुनावणी दरम्यान चर्चा करण्याचे सांगितले. तसेच इतर कुठलेही वाळूघाटाबाबत आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात (इमेलद्वारे) प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सांगितले की, जर कूणाला सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक काही विचार, सुचना टिप्पणी, इ. नोंदवायचे असतील तर ते इथे सूध्दा आज मौखीक अथवा लिखित स्वरूपात नोंदवू शकतात. प्रश्न फक्त पर्यावरण विषयकच विचारले जावेत अशी त्यांनी विनंती केली. जेणेकरून प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या योग्य मार्गदर्शन केले जाईल

व शंकांचे निरसन केले जाईल व त्याची इतिवृतामध्ये नोंद घेतली जाईल आणि सदर जाहीर लोकसूनावणीच्या चित्रफितीसहीत ते पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन येथे पूढिल योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. मा. अध्यक्ष श्री महेश वडदकर अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगितले की, एकुण ७८ घाटांपैकी ६१ घाटांचे लोकसुनावणीसाठी सादरीकरण होईल उर्वरीत १७ घाट बाद करण्यात आले आहेत. त्यानंतर सदर जाहीर लोकसूनावणीचे अध्यक्षांच्या परवानगीने, प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे प्रतिनिधी मे. मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लि. नाशिक, श्री. रामेश्वर बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. आणि पूढे सांगितले की, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक संकीर्ण- २०१९/ पी.के.०१/ता.के. ३ दि. ३ डिसेंबर, २०१९ अन्वये ५ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राच्या खाणींसाठी सार्वजनिक सुनावणी घ्यावी लागते. परभणी जिल्हयातील परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ, जिंतूर, सेलू, गंगाखेड, पालम व पूर्णा तालुक्यात प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी मागविण्यात आली आहे. कुदळ, फावडे, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. कूठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्त टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करंण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण समतोल राखण्यासाठी खाणकाम परवानगी घेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. खाणीमध्ये काम करणा-यांना वैयक्तिक संरक्षणात्मक

उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

तालुक्यातील वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**<u>तालुका परभणी-</u>**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी देशमुख | ५६, ६४, ६५,७०,७५ | २००x६५x०.५० | १३००० | २२९७ |
| २ | काष्टगाव | २०३, २०४, २०५, २०६, २०७, २०८, २०९, २१०, २११, २१२, २१३ | ६००x२०x०.४० | १२००० | १६९६ |
| ३ | वडगाव तर्फे टाकळी | १३, ५, ६, ७, ८, ११, १२, १३ | २२०x४७x०.५० | १०३४० | १८२७ |
| ४ | झरी | ६०३, ६०४, ५७७ | ३१०x६५x०.५० | १०८५० | १९१७ |
| ५ | धार | ३, ४, ५, ६, ७, ८ | ३२५x३२x०.५० | १०४०० | १८३७ |
| ६ | सनपुरी/सुलतानपुर | ५,६,७,८,९,१०,१६,१,२ | ३१०x३५x०.५० | १०८५० | १९१७ |
| ७ | नांदगाव खुर्द | ३६२, ३६३, ३६८, ३७०, ३७१, ३७२ | ५७०x४०x०.५० | २२८०० | ४०२८ |
| ८ | उखळद | ७३, ७०, ६९, ६८, ६७, ५५, ५४, ५३, ५१, ५०, ४९ | ८००x४५x०.४० | ३६००० | ५०८८ |
| ९ | पिंपळगाव टोंग | १४, १३, १२ | ४००x५०x०.५० | २०००० | ३५३४ |
| १० | सावंगी खुर्द | १०, ११, १२, १३, १४, २१, २२, २३ | ४९८x२२x०.५० | १०९५६ | १९३६ |
| ११ | राहाटी | १०/१, ९६, ९५, ९४ | २३५x४५x०.५० | १०५७५ | १८६८ |
| १२ | टाकळी बोबडे | १४२, १४३, १४४, १४५, १४६,१६२, १६३, १६४, १६६, १६७, १६८,१६९,१७०,१७१, १८२ | ३४५x३०x०.५० | १०३५० | १८२९ |

**तालुका पाथरी-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | गोपेगाव | १२,१४,११,८ | ६००x५५x०.७० | ३३००० | ८१६३ |
| २ | मंजरथ, | ८,९,१०,११ | २५०x५०x०.८० | १२५०० | ३५३४ |
| ३ | पाटोदा ग.की. | २०,२१,२३,२४,२५,२६, २७ | ६००x५५x०.५० | ३३००० | ५८३० |

**तालुका मानवत-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वांगी | १२,१३,१४,१५,१६,१७, १८,१९,९,१०,५१,५२, ५३,५४ | ७००x६०x०.५० | ४२००० | ७४२० |
| २ | कोथाळा | १९६,१९५,१५९,१९४,१९ ३,१८२ | ४००x२५x०.५० | १०००० | १७६६ |
| ३ | पार्डी | ३१,३४,३५,३६,४५,५१, ५२,५३,९१,९२,९३,९४, ९५,९६,१०५ | ५००x२०x०. ५० | १०००० | १७६६ |

**तालुका सोनपेठ -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मोहळा | १६, १७, ९, १९, २०, २३, २,३, ४, ५, ६, | ७५०x४०x०.५० | ३०००० | ५३०० |

## तालुका जिंतुर -

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वझर बु. | ४६६, ४६७, ४६८, ४७९,४७०, ४७५,४७६, ४७७, ४८० | २५०x५०x०.६० | १२५०० | २६५० |
| २ | गणेशनगर | ६, ४७,४८, ४९, ५०, ५१, १ | २५०x५०x०.५० | १०००० | १७६६ |
| ३ | सावळी बु. | ६२, ६३, ६४, ७०, ७१, ९७ | २००x५०x०.५० | १०००० | १७६६ |
| ४ | निलज | १६, १८, २०,२२, २५, २६ | २००x५०x०.५० | १०००० | १७६६ |
| ५ | पिंपळगाव गायके | ३००, ३०१, ३०२, ३०३, ३०४, ३१३, ३१५, ३१६ | ४४०x२५x०.५० | ११००० | १९४३ |

## तालुका सेलु -

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | काजळी रोहीना | ३३, ३४, ३२,३०, २९, २८, २७, २६, १४, १३, ७१, ७२, ७३, ३१, ७, ११, १२, १०, ४, १, ६३, ५८, ५९ | ५००x२०x०.५० | १०००० | १७६६ |
| २ | डिग्रस खुर्द | १, २, ३, ४, ५, २०, २३, | ५००x२०x०.५० | १०००० | १७६६ |
| ३ | वलंगवाडी | ३६, ३७, ३८, ३४, ३३, ३२, २४, २५, २६, २७, २८, २९ | ६००x२५x०.५० | १५००० | २६५० |
| ४ | आबेगाव दिगर | ८३, ८४, ८७, ८८, ८९ | ४००x३०x०.५० | १२००० | २१२० |
| ५ | पिंपरी खुर्द | १२३, १२४, १२५, १२६, १२९, १३०, २, ३, ४, ६, ७ | ५००x२०x०.५० | १०००० | १७६६ |

**तालुका गंगाखेड -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी | १, २, ७, ८,९, १०,११,१२ | २२१x४८x०.७० | १०६०८ | २६२४ |
| २ | महातपुरी | ४, ६, ७, ९, १०, ११, १२, १५, १८, २०, २१ | ६९०x४८x०.५० | ३३१२० | ५८५२ |
| ३ | आनंदवाडी (महातपुरी अंतर्गत) | २८०, २८८, २८९, २९३, ३०० | ९८०x५०x०.५० | ४९००० | ८६५७ |
| ४ | चिंचटाकळी आणि गौंडगांव | १३२, १३४, १३९, १४०, १४५, १४९, १५०, १५२, १५३, ३६१, ३६२, ३६४, ३६५, ३६६, ३६७, ३६८, ३७०, ३७१, ३७२ | ३०३x७१x०.६० | २१५१३ | ४५६१ |
| ५ | नागठाणा | ११०, ११३, ११५, ११८, १२३, १३३, १३४, १५३, १५५ | ५६५x४९x०.५० | २७६८५ | ४८९१ |
| ६ | धारासूर परिसर | ७६५, ७५७, | ४४८x४५x०.५० | २०१६० | ३५६२ |

**तालुका पालम -**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बरबडी | ३, ४, ५ | ३५०x३०x०.६० | १०५०० | २२२६ |
| २ | राहाटी | ३, ४, ५, २२, २३, २५, २६ | ३५०x३५x०.५० | १२२५० | २१६४ |
| ३ | गुंज | ५१, ५२, १, ९, १०, ११, १९ | ४००x३०x०.६० | १२००० | २५४४ |
| ४ | धनेवाडी | ५९, ६० | २१०x६०x०.६० | १२६०० | २६७१ |
| ५ | फळा | १, ११०, ८६, ८८, ८९, ८१ | ३६०x३०x०.५० | १०८०० | १९०८ |
| ६ | दुटका | ३, ४, ५, ६, ७, १०, ११, | ५००x३०x१.०० | १५००० | ५३०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १२, १६, १७, ३१, ३२, ३५, ३६ | | | |

## तालुका पुर्णा -

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र चौ. मी. | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | देवठाणा | ७६,१७०,१६९,१६८,१६७, | २६५x९५x०.४० | २५१७५ | ३५५८ |
| २ | देऊळगांव दुधाटे | ९३५,९३७,९३३,९३२, ९३१, ८८५ | २९०x४५x०.५० | १३०५० | २३०६ |
| ३ | मुंबर | २८२,२८१,२७९,२७७, २७६,२७५ | ३००x४५x०.५० | १३५०० | २३८५ |
| ४ | धानोरा काळे | २४,२५,२६,२३,१२,१३, ४४५,५४५ | ४००x७५x०.५० | ३०००० | ५३०० |
| ५ | वझुर | २२८,२३२,२३६,२४३,२४६,२४२ | ४००x६५x०.५० | ३६००० | ४५९४ |
| ६ | खरबडा | २६२,२६१,२६०,२५८, २४७,२४८,२४९,२५०, २५१,२५२ | ३७५x६५x०.४० | २४३७५ | ३४४५ |
| ७ | मिठापुर | २०,१९,१८,१७,१६,१५ | ३५०x५५x०.५० | १९२५० | ३४०० |
| ८ | बानेगांव | १,२,३ | ४००x३०x०.५० | १२००० | २१२० |
| ९ | कौडगांव | ९,८,२,१,५०,४९,४८,४७ ,४६,४५,४४,४३,४२ | १२००x३०x०.४० | ३६००० | ५०८८ |
| १० | धानोरा मोत्या | ३०९ ते ३१८, ३०१ ते ३०३, ३०७,३०८,२८५,२८१, २८२,२८३,२८४,२८६, २८७,२८८ | ४७०x६५x०.५० | ३०५५० | ५३९८ |
| ११ | पेनुर | ७८, ८१ ,८२ ,८३, ८६, ८७,८८,८९,९०,९१,९२, ११,१९०,१९२,१८७,१८८, | ८००x६०x०.५० | ४८००० | ८४८१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १८९ | | | |
| १२ | निळा | ९५, १६२, १६९, १६८, १८७, १८८, १९० | ३००x४५x०.५० | १३५०० | २३८५ |
| १३ | सातेफळ | १२, २७३, २७४, २७५, २७७, २८९, २८०, २८१, २८२, २८४, २८५, २८६, २८७, २८८, २८९ | ५५०x७०x०.४० | ३८५०० | ५४४२ |
| १४ | कळगांव | १, २, ३, ४, ५ | ३५०x७०x०.५० | २४५०० | ४३२९ |
| १५ | कान्हेगांव | ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६ | ३००x४५x०.३० | १३५०० | १४३१ |
| १६ | फुकटगांव | २०, २९, ३१, | ४००x३०x०.५० | १२००० | २१२० |
| १७ | धनगर टाकळी | ८, १३, १४, १५, १६, १७, २१, २२, २५, २६, २७, २८, २९, ३१, ३२, ३६, ३९, ४० | ४००x४५x०.५० | १८००० | ३१८० |
| १८ | कंठेश्वर | ३, २१७,१८७, १८६, २२१ | २००x४५x०.५० | ११००० | १९४३ |
| १९ | पिंपळगांव लिखा | २६८, २६७, २७३, २७४, २७८ | ३००x५०x०.५० | १५००० | २६५० |
| २० | पिंपळगांव सारंगी | २०, २१, २२, ११७, ११२, १११, ११०, १०८, १०२, १०१, ९७ | ३४५x५५x०.५० | १८९७५ | ३३५२ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक यांनी उपस्थितांना आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान परभणी जिल्हयातील परभणी, पाथरी, मानवत, सोनपेठ, जिंतूर, सेलू, गंगाखेड, पालम व पूर्णा तालुक्यातील सहभागी लोकांनी प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

१. **श्री. संजय शिंदे, सरपंच, सनुपरी रा. सनपुरी, ता. परभणी, जि. परभणी**
यांनी विचारले की, सनपुरी वाळुघाटाची वाळु लिलावधारकास संपुर्ण उत्खननास परवानगी देणार की काही वाळुसाठा शिल्लक ठेवणार?

श्री. रामेश्वर बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले उत्खननासाठी वाळुचे प्रमाण १९१७ दर्शवलेली आहे उत्खननास तेवढीच परवानगी असेल. लिलावात वाळूघाट निकाली लागला तर वाळुघाटाचा लीलाव होईल अन्यथा तसाच राहिल.

२. **श्री. सुनील पांढरकर, सरपंच, सावंगी खुर्द, रा. सावंगी खुर्द ता. जि. परभणी**
यांनी विचारले की, पर्यावरण विकास निधी किती राखीव ठेवला आहे.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, वाळु घाटाच्या एकुन लिलाव रकमेच्या २५% रक्कम राखीव ठेवलेली आहे.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, वाळुघाटाच्या लिलीवप्रक्रीया पुर्ण झालेनंतरच २५% रक्कम ग्रामपंचायतकडे वर्ग करण्यात येईल.

३. **श्री. रामप्रसाद झाडे, रा. पिंपळगाव टोंग, ता. जि. परभणी.**
यांनी सांगितले की, मागच्या वेळेस वाळु लिलाव झाले परंतु त्याचा कुठलाही विकासनिधी आलेला नाही.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, ग्रामपंचायतकडे नीधी देण्यात येतो तथापी याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर चौकशी करुन ग्रामपंचायतीला निधी देण्यात येईल.

४. **श्री. कोंडीबा गाढवे, ग्रामसेवक उखळद ता. जि. परभणी.**
यांनी सांगितले की, लिलाव झालेल्या वाळुघाटाचा कुठलाही निधी ग्रामपंचयतीला आलेला नाही.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, संबधीत ग्रामपंचायतीला निधी देण्यात येईल.

डॉ प्रविण जोशी, सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ. यांनी सांगितले की, प्रकल्प सल्लागार यांनी पर्यावरण विषयक उपक्रम उपस्थितांना पुनश्च: विषद करावेत.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी पर्यावरण विषयक उपक्रमबाबत पुनश्च: सादरीकरण केले.

डॉ प्रविण जोशी, सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ यांनी सांगितले कि, पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या मध्ये विकासनीधी वाटपाबाबत नमुद केलेले नाही.

५. **श्री. ज्ञानेश्वर भालेराव, सरपंच, नांदगाव खुर्द, ता. जि. परभणी.**

यांनी सांगितले की, वाळु वाहतुक होणा-या रस्त्याची अवस्था खुप खुराब झाली आहे.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना ज्या रस्त्याचा वापर करण्यात येईल त्यासाठी निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे लिलावधारक रस्त्याची डागडूजी करुन देईल.

६. **श्री. अशोकराव गिराम, सरपंच, गोपेगाव, ता. पाथरी जि. परभणी.**

यांनी विचारले की, वाळु उत्खनन कोणत्या पदधतीने होणार. वाहतुक कोणत्या वाहनाने होणार तसेच स्थानिक लोकांना लिलावधारकाचा त्रास होणार नाही.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, मनुष्यबळाच्या साहाय्याने वाळु उत्खनन होईल तसेच वाळुची नदीपात्रातुन वाळुसाठयापर्यत ट्रक्टर व ट्रालीव्दारेच वाहतुक करण्यात येईल.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, स्थानिक लोकांना लिलावधारकाकडुन त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

७. **श्री. भारत घुगे, सरपंच, सावळी बु. ता. जिंतुर जि. परभणी.**

यांनी विचारले की, लिलावप्रक्रीयेचा कालावधी किती असेल लिलाव कधी होणार? लिलाव लवकर झाला पाहिजे जेणेकरूर अवैध उत्खननास आळा बसेल. घरकुल योजनेतील बांधकामास वाळु मिळेल.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, पर्यावरण अनुमती प्राप्त झालेनंतर वाळूघाटाचा लिलाव होईल.

८. **श्री. योगानंद नागरे, उपसरपंच, सावळी बु. ता. जिंतुर जि. परभणी.**
यांनी सुदधा वाळुघाटाचा लिलाव लवकर झाला पाहिजे असे सांगितले.

९. **श्री. राजाभाउ शेषराव जाधव, पोलीस पाटील, पिंपरी खुर्द. ता. सेलू जि. परभणी.**
यांनी सांगितले की, वाळुघाटाचा लिलाव नाही झाला पाहिजे वाळु वाहतुक करणा-या वाहनामुळे रस्ते खराब होतात तसेच नदीपात्रानजिकच्या विहीरीच्या पाण्याचे स्त्रोत खराब होतात.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, लिलावधारक रस्त्याची दुरूस्ती करुन देण्याची जबाबदारी लिलावधारकावर आहे, त्यासाठी निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे. प्रस्तावीत वाळुघाटाच्या जवळ कुठलेही पिण्याच्या पाण्याचे विहीरीचे स्त्रोत नाहित.

१०. **श्री. भारत तुकाराम विभुते, सरपंच, काजळी रोहिना. ता. सेलू जि. परभणी.**
यांनी सांगितले की, वाळुघाटाचा ठिकाणी CCTV कॅमेरे लावावेत व ते चालू राहतील याबाबत दक्षता घ्यावी.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, लिलावधारकाने CCTV कॅमेरे लावावेत अशी अट आहे.

श्रीमती वंदना मस्के, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्थीप्रमाणे लिलावधारकाने CCTV कॅमेरे लावावेत अशी अट आहे तसेच संबधीत तहसिलदार यांना ते चालू राहतील याबाबत लक्ष देणेबाबत सुचीत केले जाईल असे सांगितले.

११.**श्री. मोईन कादरी, रा. आबेगाव दिगर, ता. सेलू जि. परभणी.**
यांनी सांगितले की, आबेगाव दिगर गट ग्रामपंचायत आहे वाळूघाट आंबेगाव दिग्रस मध्ये आहे आंबेगाव दिग्रस गावातील ग्रामपंचायत मध्ये एकच सदस्य असल्याने ग्रामपंयायतीधील दुस-या गावांना अधिक फायदा होतो.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, ग्रामपंचायतीमधील गावांची नोंद घेवुन निधि वितरीत करताना आबेगाव दिगर गावाला प्राधान्य देण्यात येईल.

१२. **श्री. गोविंद उत्तमराव मुंडगीर, रा. महातुपुरी, ता. गंगाखेड जि. परभणी.**
यांनी सुचीत केले की, सदयस्थितीत नदीपात्रात पाणी आहे.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, नदीचे पात्र वाळुघाटाच्या ठिकाणी कोरडे झालेनंतर लिलावधारकाने वाळु उत्खनन करावे अशी अट करण्यात येईल.

१३. **श्री. दिलीप नागनाथराव उखाडे, रा. गौंडगाव, ता. गंगाखेड जि. परभणी.**
यांनी सांगितले की, मागच्या वेळेस वाळु लिलाव झाले परंतु त्याचा कुठलाही विकासनिधी आलेला नाही.

श्रीमती वंदना मस्के, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगीतले की, दोन ते तीन महिन्यामध्ये ग्रामपंचायतकडे नीधी वर्ग करण्याची प्रक्रीया सुरू करण्यात येईल.

१४. **श्री. प्रदीप भगवानराव शिंदे, रा. आनंदवाडी (महातुपुरी अंतर्गत), ता. गंगाखेड जि. परभणी.**
यांनी सांगितले की, वाळु लिलाव झाले परंतु निधी प्राप्त झालेला नाही.

श्रीमती वंदना मस्के, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी सांगीतले की, लिलावधारकाने भरलेली अनामत रक्कम परत केलेनंतर निधी देण्यात येईल.

**१५. श्री. किरण बापुराव चाफळे, रा. महातुपुरी, ता. गंगाखेड जि. परभणी.**

यांनी सुचीत केले की, सदयस्थितीत नदीपात्रात पाणी आहे तसेच महातपुरी बंधारा आहे व त्यातील पाणी कमी होणार नाही.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, नदीचे पात्र वाळुघाटाच्या ठिकाणी कोरडे झालेनंतर लिलावधारकाने वाळु उत्खनन करावे अशी अट करण्यात येईल नदीपात्रात पाणी असल्यास वाळुघाटाचा लिलाव होणार नाही.

**१६. श्री गजानन बालाजी शेवटे, ग्रामसेवक, राहाटी, ता. पालम, जि. परभणी**

यांनी सुचीत केले की, वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना ठरवुन दिलेल्या रस्त्यावरूनच वाळूची वाहने नेण्याची परवानगी देणे.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, गावातील उपलब्ध असलेल्या रस्त्यावरूनच वाळूची वाहने जातील. गावातील इतर रस्त्यावरुन वाळूची वाहने जाणार नाहीत याची दक्षता ग्रामपंचायतीकडुन घेतली जाईल. वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना उपलब्ध पर्यायी रस्त्याचा वापर करण्यात येईल.

**१७. श्री धेर्यशील वंदाडे, रा. फळा, ता. पालम, जि. परभणी.**

यांनी सुचीत केले की, वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना वाहने अच्छादित करुन वाळूची वाहतूक करावी.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना वाहने अच्छादित करुन वाळूची वाहतूक केली जाईल.

**१८. श्री सदाशिव संभाजी डुकरे, रा. दुटका, ता. पालम, जि. परभणी.**

यांनी सुचीत केले की, मागच्या वेळेस लिलाव झाल्याप्रमाणे यावेळेस वाळुघाटाचा लिलाव करणे.

डॉ प्रविण जोशी, सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, यांनी सांगितले कि, झाडाची लागवड करणे लिलावधारकास

अट आहे झाडांची लागवड झालेनंतर संबधीत ग्रामपंचायतीस झांडाची देखभाल करावे. फिरते शौचालय देखभाल करणेकरीता नीधी राखीव केलेला नाही.

श्री. रामेश्वर कुंडलिक बोरकर, प्रकल्प सल्लागार यांनी सांगीतले की, सुधारणा करुन फिरते शौचालय देखभाल करणेकरीता नीधी राखीव केला जाईल.

**१९. श्री सुधाकर माणिकराव भोसले, रा. बानेगाव, ता. पुर्णा, जि. परभणी.**

यांनी सांगितले कि, वाळुघाटाला जाणारा रस्ता अरुंद असून गावाच्या शाळेजवळून वाळूची वाहतुक करणारी वाहने जातात.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, वाळु घाटावरुन वाळु नेत असतांना लिलावधारकास संबधीत ग्रामपंचायतीने पर्यायी रस्ता करुन देणे.

डॉ प्रविण जोशी, सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ यांनी सांगितले कि, वाळुची उत्खनन करताना लिलावधारकाकडुन पर्यावरण अनुमतीमधील नियमाचे पालन होणे आवश्यक आहे तसेच इतरही नियमाचे पालन होते कि नाहि याची संबधीत ग्रामपंचायतीने दक्षता घेणे.

**२०. श्री प्रकाश गणपती माहिते, रा. धानोरा मोत्या, ता. पुर्णा, जि. परभणी.**

यांनी सुचीत केले की, सदयस्थितीत नदीपात्रात पाणी आहे. तसेच स्थानिक गावक-यांना लिलावप्रक्रीयेत भाग घेता येईल काय? लगतच्या जिल्हातुन नदीतील जलमार्गाव्दारे तराफयाने साहाय्याने आपल्या जिल्हयातील नदीपात्रातील वाळुची चोरी केली जाते.

श्रीमती वंदना मस्के, जिल्हा खनिकर्म अधिकारी, परभणी यांनी सांगीतले की, नदीचे पात्र वाळुघाटाच्या ठिकाणी कोरडे झालेनंतर लिलावधारकाने वाळु उत्खनन करावे अशी अट करण्यात येईल.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगितले की, स्थानिक गावक-यांना नियमानुसार लिलावप्रक्रीयेत भाग घेता येईल. तसेच जिल्हयातील नदीपात्रातील वाळुची चोरी केली जात असेल तर संबधीत तहसिलदाराने कारवाई करावी.

डॉ प्रविण जोशी, सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ यांनी सांगितले कि, वाळुची उत्खनन करताना

लिलावधारकाकडुन वाळुचे नियमाप्रमाणे उत्खनन होणे आवश्यक त्यासाठी पर्यावरण लोकसुनावणी आयोजन केले आहे.

२१. **श्री नानासाहेब भुजंगराव भुते, रा. निळा, ता. पुर्णा, जि. परभणी.**

रात्री बेरात्री वाळुचे अवैध उत्खनन होते त्यामुळे वाळुलिलाव लवकरात लवकर लिलाव गरजेचे आहे जेणेकरुन रात्री बेरात्री वाळुचे अवैध उत्खनन होणार नाही.

श्री महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी सांगीतले की, पर्यावरण समतोल ठेवण्यासाठी शासन निर्देशानुसार जाहीर लोकसुनावणी घेणे बंधन कारक आहे. सदरील लोकसुनावणीसाठी ठरवुन दिलेल्या कालमर्यादेप्रमाणे मंजुरीसाठी लागणा-या वेळेत गावस्तरावर नदीपात्रातील वाळुचे अवैध उत्खनन होणार नाही याकरीता संबंधीत गावचे तलाठी यांनी लक्ष देवुन अवैध उत्खनन रोखने व त्याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

श्री. सो. म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, आणखी कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे सदर सुनावणीचे समन्वयक यांनी संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणी अध्यक्षांच्या परवानगीने सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **सो. म. कुरमुडे** | **डॉ. प्रविण जोशी** | **महेश वडदकर** |
| (समन्वयक) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, परभणी. | प्रादेशिकआधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद. | अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी परभणी. |